पत्र

८८०

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/प्र.क्र.०१/ /फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दि. ९ मार्च,२०१८

प्रति,

**मे,**

............................
............................
............................
............................

**विषय : प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना २०१८-१९**
सूक्ष्म सिंचन उत्पादक कंपनी नोंदणी नुतनीकरणाबाबत...

राज्यामध्ये विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यासाठी सन २०१६-१७ मध्ये १०५ ठिबक / तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांना ३ वर्षासाठी(२०१६-१७ ते २०१८-१९) व सन २०१७-१८ मध्ये १५ ठिबक / तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांना ५ वर्षासाठी (२०१७-१८ ते २०२१-२२) नोंदणीस मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनांतर्गत ई-ठिबक अज्ञावलीव्दारे योजनेची अंमलबजावणी एप्रिल,२०१८ पासून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांना, सन २०१८-१९ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनांतर्गत कामे करण्यासाठी, नोंदणी नुतनीकरणास ***प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत राज्यस्तरीय मान्यता समितीच्या*** मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यासाठी आपला नोंदणी नुतनीकरणा साठीचा प्रस्ताव कंपनीने स्वतः अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधीव्दारे खालील आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतिसह दिनांक २० मार्च,२०१८ पर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**१. विक्री पश्चात सेवा केंद्राची अद्यावत यादी**
**२. कंपनीने प्राधिकृत केलेल्या जिल्हा निहाय विक्रेत्याची यादी**
**३. उत्पादक कंपनीचे सन २०१८-१९ चे घटक निहाय दर पत्रक**
**४. सन २०१७-१८ मध्ये व्हॅट(दि.३०.०६.२०१७ पर्यंत)/१ जुलै,२०१७ पासून जीएसटी भरले बाबतचे महिनावार विवरणपत्र.**
**५. सक्षम प्राधिकाऱ्याचे जीएसटीएन / डीआयएन नोंदणी प्रमाणपत्र.**
**६. रु.५०० च्या स्टँप पेपरवर नोटराईज केलेला उत्पादक कंपनीचा करारनामा (सन २०१८-१९)**
**७. ग्रास प्रणालीव्दारे नोंदणी नुतनीकरण नापरतावा शुल्क रक्कम रु.२५०००/- भरलेबाबतची पावती**

८. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचना घटकांच्या केंद्र शासनाने सन २०१७-१८ मध्ये प्रसारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनातील परिच्छेद १४.३ ते १४.६ व १४.१० नुसार कंपनी स्वतः उत्पादीत करीत असलेल्या / अन्य सुक्ष्म सिंचन संच उत्पादकाकडून बाहयस्त्रोताकडून घेवून विक्री करणार असलेल्या घटकांचे *सन २०१८-१९ वर्षासाठी वैध असलेले बीआयएस(BIS) प्रमाणपत्र.*

९. कृषि आयुक्तालयाचे क्र.कृआआ-२०१७/सुसिंयो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.०१/५१३,दि.९ फेब्रुवारी,२०१८ क्र.कृआआ-२०१७/सुसिंयो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.०१/५१४,दि.९ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यंनी उत्पादीत केलेले व त्यांचे वितरकामार्फत विक्री केलेल्या सुक्ष्म सिंचन संच घटकांची तसेच त्यांनी सुक्ष्म सिंचन संच विक्री पोटीच्या आर्थिक उलाढालीनुसार शासनास जमा केलेल्या व्हॅट व जीएसटीच्या जिल्हास्तरावर सादर केलेल्या माहितीची प्रत.

१०. बँक गॅरंटीची मुदत संपली असल्यास अद्ययावत बँक गॅरंटी मुळ प्रत / वैध बँक गॅरंटीची साक्षांकीत प्रत.

(प्र.ना.पोकळे)
संचालक,फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,पुणे - ४११ ००५